
मॉडर्न
१९८४-८५

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५.

# मॉडर्न

## १९८४–८५

### संपादन समिती

अध्यक्ष :

प्राचार्य स. य. गंभीर

समिति-सदस्य :

प्रा. चंद्रकान्त कुलकर्णी

प्रा. सौ. भारती डोळे

प्रा. राजीव कुलकर्णी

प्रा. सौ. लीना पाटणकर

प्रा. सौ. सुमती नाडगीर

डॉ. सौ. कांचनमाला गंधे

विद्यार्थी-प्रतिनिधी :

श्री. अनिल झेंडे, तृ. व. कला.

संपादक :

डॉ. दत्तात्रय पुंडे

मुखपृष्ठ : राजीव कुलकर्णी

प्रकाशक : प्राचार्य स. य. गंभीर
मॉडर्न महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे ४११००५.

मुद्रक : श्री. सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ४११०३०.

ठसे : श्री. सुधीर खाडिलकर
सुप्रीम प्रोसेस
टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

# संपादकीय

प्राचार्य स. य. गंभीर यांनी यंदाच्या नियकालिकाच्या कामात जातीने लक्ष घातले. त्यांचा मी कृतज्ञ आहे.

श्री. राजीव कुलकर्णी यांनी अंकाची संपूर्ण जबाबदारी सांभाळली. ते माझे सहकारी तर आहेतच, पण मुख्य म्हणजे जवळचे स्नेही आहेत. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणारे नाही. या अंकाचे देखणे मुखपृष्ठ त्यांनी स्वतः तयार केलेले आहे.

महाविद्यालयाचे कुलसचिव श्री. वसंतराव देशपांडे, अधीक्षक श्री. एस्. वाय्. कुलकर्णी, कर्मचारी श्री. दिलीप खोपकर आणि ग्रंथपाल श्री. द. गो. बापट यांनी तत्परतेने सर्व प्रकारचे सहकार्य दिले. या सर्वांचा मी ऋणी आहे.

समिति-सदस्यांचेही आभार

**दत्तात्रय पुंडे**
संपादक

# विशेष अभिनंदन !

महाविद्यालयाच्या पदार्थविज्ञान विभागातील प्राध्यापिका सौ. सुलभा अजय देऊसकर यांचा Study of Positronium Pick-off Process in Organic Liquid या विषयावरील प्रबंध मान्य होऊन त्यांना पुणे विद्यापीठाने पीएच्. डी. पदवी प्रदान केली आहे. श्रीमती देऊसकर यांनी पुणे विद्यापीठाच्या वास्तवशास्त्र विभागातील डॉ. एस्. के. डेव्हिड यांच्या मार्गदर्शनाखाली वरील विषयाचे संशोधन केले होते. यापूर्वी श्रीमती देऊसकर यांचे विविध संशोधनपर निबंध आंतरराष्ट्रीय जर्नल्स-मधून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचा Solid State Communications या विषयावरील निबंध Singapore Journal of Physics मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. त्यांनी चवथ्या व सहाव्या International Conference on Position Annihilation मध्ये तसेच Asia Pacific Physics Conference मध्ये वाचलेले निबंधही आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध झाले आहेत. Department of Atomic Energy तर्फे भरणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील परिषदांतूनही त्यांनी सुमारे १० निबंध आतापर्यंत सादर केलेले आहेत.

मराठी विभागातील प्राध्यापिका सौ. स्नेहल तावरे यांचा "शिवछत्रपतींवरील दीर्घकाव्ये आणि महाकाव्ये : एक चिकित्सक परामर्श" या विषयावरील प्रबंध मान्य होऊन त्यांना पुणे विद्यापीठाने पीएच्. डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांना डॉ. वि. रा. करंदीकर यांचे मार्गदर्शन लाभले होते. डॉ. तावरे या मॉडर्न महाविद्यालयाच्याच माजी विद्यार्थिनी होत. त्यांना एम्. ए. परीक्षेत "अलंकार" या विषयासाठीचे पारितोषिक मिळाले होते. त्यांनी काही नियकालिकांतून पुस्तक-परीक्षणे लिहिली आहेत. मुंबई दूरदर्शनसाठी त्यांनी बालनाट्येही लिहिले होते.

प्रा. पी. जी. दीक्षित यांनी A Study of Process with Independent Increments" या विषयावर लघुशोधनिबंध लिहून पुणे विद्यापीठाची एम्. फिल्. पदवी मिळविली आहे. संख्याशास्त्र विभागातील डॉ. एम्. एस्. प्रसाद यांनी त्यांना मार्गदर्शन केले होते.

प्रा. सौ. व्ही. आर. प्रयाग यांनी संख्याशास्त्र विषयातील एम्. फिल्. पदवी मिळविली. त्यांना डॉ. जी. बी. मराठे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या शोधनिबंधास Outstanding Grade प्राप्त झाली आहे.

डॉ. देऊसकर, डॉ. तावरे, प्रा. दीक्षित व प्रा. प्रयाग यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**दत्तात्रय पुंडे**
संपादक

॥ श्रद्धांजली ॥



श्रीमती इंदिराजी गांधी

## ॥ श्रद्धांजली ॥



श्री. यशवंतरावजी चव्हाण



क्रीडा संघटना : १९८४-८५



कलामंडळ : १९८४-८५

## पुरुषोत्तम करंडक विजेता संघ



## राष्ट्रीय सेवा योजना



बसलेले ( डावीकडून ) : श्री. जावळे चंद्रमणी ( विद्यार्थी प्रतिनिधी ),
प्रा. गोहेल, प्रा. वाणी ( राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख ),
डॉ. पांडे, प्रा. दीक्षित
उभे : सर्वश्री कामठे, डबीर व शिर्के

## आंतर–महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन महिला विजेता संघ

**वरिष्ठ महाविद्यालय**



वसलेले ( डावीकडून ) : श्री. छात्रा (क्रीडा शिक्षक ), कु. माधवी भात्रे,
कु. उज्वला कळसकर, श्री. शेरीकर ( क्रीडा शिक्षक )
उभे ( डावीकडून ) : कु. अवसरीकर, कु. अंजली दीक्षित, कु. श्यामला पाटील

## आंतर–महाविद्यालयीन कबड्डी महिला विजेता संघ



उभे ( डावीकडून ) : कु. भागवत, कु. रणपिसे, कु. बोऱ्हाटे, कु. जयश्री जोशी ( संघ व्यवस्थापक ),
कु. साबळे, कु. दीक्षित, कु. तागुंदे, कु. सुर्यवंशी
खुर्चीवर : श्री. विश्वास जोशी ( मार्गदर्शक ), प्रा. लागू (क्रीडा संघटक ), प्रा. छात्रा (क्रीडा संघटक ),
खाली बसलेले : कु. काळे, कु. बागवडे

## आंतर–महाविद्यालयीन ( पुरुष ) ज्युदो विजयी संघ

**वरिष्ठ महाविद्यालय : १९८४–८५**



बसलेले ( डावीकडून ) : खेडकर, जोशी, प्रा. दांडेकर, कदम ( I. C. S. R. ), झिरपे
उभे : यादव, पिसे, भिंताडे, तापकीर

## आंतर–विद्यापीठ खेळाडू : १९८४–८५



## व्हॉलीबॉल



बसलेले : सर्वश्री म्हात्रे, पालांडे, प्रा. गोयल ( संघ व्यवस्थापक ),
छाब्रा ( मार्गदर्शक ), गायकवाड ( कर्णधार ), यनपुरे
उभे : सर्वश्री थोपटे, गुरव, मोहिते, शिर्के, साळवी

## बॅडमिंटन आंतरराज्य विजेता संघ
### कनिष्ठ महाविद्यालय



सर्वश्री : रणपिसे, गांधी, छाब्रा ( मार्गदर्शक ), प्रा. गोयल ( संघ व्यवस्थापक ), शहा, शितोळे

## आंतरराज्य शालेय बॉस्केट-बॉल ( मुले ) संघ
### कनिष्ठ महाविद्यालय



बसलेले डावीकडून : सर्वश्री अतुल गदगकर, आशिष गदगकर, प्रा. छाब्रा ( क्रीडा संघटक ), प्रा. शेरीकर ( मार्गदर्शक ), नाथ केसकर

उभे डावीकडून : सर्वश्री थोरात, पंडित, नानकर, गांधी, देवकर, टिल्लू, उंडे, अटाल्ट्टी, पुरंद

## गदगकर करंडक विजेता संघ



## ॥ अभिनंदन ॥

पीएच्. डी. पदवी — एम्. फिल्. पदवी



डॉ. सुलभा देऊसकर



डॉ. स्नेहल तावरे



प्रा. अरुण दीक्षित



प्रा. व्ही. आर. प्रयाग

## ॥ विद्यार्थी वैभव ॥



सुधीर पाळंदे (व्हॉलीबॉल)



अंजली दीक्षित (व्हॉलीबॉल)



माधवी भावे (व्हॉलीबॉल)



विक्रम शितोळे (U.R.)



राजेंद्र यादव
ज्युदो राष्ट्रीय खेळाडू



राजेंद्र कदम I.C.S.R.
व्हॉलीबॉल, बॉल–बॅडमिंटन,
विद्यापीठ व राष्ट्रीय खेळाडू



विपीन पाटोळे
कलामंडळ सचिव



अनिल डांगे
सॉफ्टबॉल
महाराष्ट्र राज्य खेळाडू

अ. भा. खो खो संघटनेचा
राणी लक्ष्मीबाई पुरस्कार
१९८४-८५



कु. स्मिता प्रभाकर जोशी, द्वि. व. वा.

## यांनी जिंकला पुरुषोत्तम करंडक





कु. शुभदा शहा श्री. गगनविहारी बोराटे



पुणे जिल्हा मराठी प्राध्यापक संघटना व
मॉडर्न महाविद्यालय मराठी विभाग आयोजित
'माणसं' या पुस्तकावरील चर्चासत्रात चर्चानिबंध
वाचताना डॉ. चंद्रशेखर बर्वे.
बसलेले : डॉ. गं. ना. जोगळेकर, अध्यक्ष.

# अश्विन पुंडलीक आंतर-महाविद्यालयीन काव्यलेखन स्पर्धा

अश्विन पुंडलीक आंतर–महाविद्यालयीन काव्य स्पर्धेमध्ये १९८४–८५ चे पारितोषिक संगमनेर येथील संगमनेर महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. प्रमोद बियाणी यांना मिळाले. त्यांची "गांधी आणि माओ" ही कविता सर्वोत्कृष्ट ठरली. पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. विकास हुंडे यांची "ट्रॅप" आणि गरवारे वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. सुशील अच्युत अत्रे यांची "त्यांची कविता" या दोन कविता उल्लेखनीय ठरल्या.

यंदा स्पर्धेकरिता एकूण २२ महाविद्यालयांतील ५० विद्यार्थ्यांनी ९६ कविता सादर केल्या होत्या. पारितोषिक-पात्र कवितेची निवड करण्याचे काम उपप्राचार्य सीताराम रायकर, डॉ. वि. भा. देशपांडे व प्रा. विजय जोशी यांनी केले. महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात श्री. निकम यांच्या हस्ते श्री. बियाणी यांना पारितोषिक देण्यात आले.

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्याधर पुंडलीक यांचा मुलगा कै. आश्विन पुंडलीक याच्या स्मरणार्थ मॉडर्न महाविद्यालय ही स्पर्धा आयोजित करते.

**डॉ. द. दि. पुंडे**, संयोजक
अश्विन पुंडलीक आंतर महाविद्यालयीन काव्य-लेखन स्पर्धा

---

## गांधी आणि माओ....



महात्म्याचा अर्थ आज बदलला आहे
गांधींच्या खादीचा संदर्भ
आता खरे तर तुटला आहे.
गांधी आणि मी यांच्यामधील पूल
आता उद्ध्वस्त झाला आहे.
गांधीच्या पुतळ्यांना
केवळ सौंदर्यमूर्ती म्हणूनच
महत्त्व शिल्लक आहे.
स्फूर्ति आणि आदर्शांचे वारे
पूर्वेकडे यायला आता भिते आहे.
पश्चिमेतल्या फॅशनबरोबर
दक्षिणेतला माओ मात्र
इकडे वाहून आला आहे.
चित्रपटातल्या गांधीलाही
तरुण पिढीचा संदर्भ नाही.
इतिहासातील पुस्तकातल्या
महात्म्याच्या फोटोला
'हे कोण?' म्हणून

नव्या तरुण पिढीचेच प्रश्न आहेत.
फॅशनेबल गांधींची वाट पहात
पुलापलीकडे कुणीतरी उभे आहे.
बलिदान पावलेल्या महात्म्याच्या आत्म्यापेक्षा
सुपरफिल्मस्टारच्या पुण्यात्म्याला
आम्ही देव मानला आहे.
दगडाचे संदर्भसुद्धा
आता बदलले आहेत.
टेरिकॉट खादीवर
' इम्पोर्टेड ' ट्रेडमार्क आहेत.
म्हणूनच म्हणतो—
पुलाखालून खूप पाणी वाहून गेले आहे.
धर्माचा अर्थ बदलला आहे
पृथ्वी आपला अक्ष सोडून
पुन्हा एकदा फिरली आहे.
विजयाचे अर्थ आता
सांडलेल्या रक्ताशी नाते जोडतात
अन् मानवतेचा संदर्भ आता
माणुसकीपासून दूर सरकला आहे.
पेपरमध्ये जाहिरात देऊन
' वॉन्टेड 'च्या सदराखाली
मदर तेरेसा विकत घेता येतील
असे म्हणणाऱ्या घमेंडखोर सत्ताधाऱ्यांचा
आणि रक्तपिपासू भांडवलदारांचा
हा रक्तकाळ आहे.

पराभवाची परिणती सूडात होते
आणि इराकइस्राएल वर्षानुवर्षे
एकमेकांत लढत राहतात.
अमेरिका रशियाने लावलेल्या
कोंबड्यांच्या झुंजीमध्ये
कोंबडा आता घायाळ झाला आहे
त्यासाठीच पुन्हा गांधी हवा आहे.
ज्यांना रक्त सांडणे माहित नाही
ते महात्म्यांना शिव्या घालतात.
समाजाच्या हिताची
ज्यांना काही समज नाही
ते महात्म्याचा माओ करू पहातात
या चक्राला इतिहासाचाच एक संदर्भ आहे.
पायरीचा दगड कळसावर बसवणाऱ्यांना
महात्म्याच्या बलिदानाची किंमत नसते,
त्यांना त्यांच्या राजकीय जीवनाची
किंमत सांभाळायची असते.
म्हणूनच असे वाटते की,
पुन्हा एकदा गांधी धोक्यात आहे.
गांधींचा माओ होण्यापूर्वीच
स्वच्छ गांधी पुढे यायला हवा आहे.

– **प्रमोद बियाणी**
संगमनेर कॉलेज,
संगमनेर, जि. नगर.

---

# ट्रॅप

○

ह्या कवितेची सुरुवात मला सापडत नाही.
अस्पष्टशी हाक किंवा
पैंजणाचे पुसटसे नादही स्मरत नाहीत.
पण त्याविना अडते असे थोडेच आहे!
झाडांनी काळोखातही उमलून पहावे
म्हणजे वेलींच्या सहाय्याने ती

फुले टाकू लागतात
असे सांगणारी माझी प्रिय मैत्रिण
एके दिवशी मित्रत्वाच्या सर्व सीमा तोडून
पूर्वसूचनेशिवाय परदेशी झाली ...
तेव्हापासून लागलेली वाळवी
शरीराला अजून पोखरते आहे

आतापर्यंत.
तिला यात काळोख व्हायचे होते का !
प्रेयसी आणि मैत्रिण यातील अस्पष्ट
सीमारेषेवर उभी राहून
तिने हातलेल्या हाकांचे पडसाद
अजून माझ्या हृदयभर का उमटताहेत ?
माझ्याही नकळत ती माझी
प्रेयसी तर झाली नव्हती ना ?
या गुंत्याचा उगम मला सापडत नाही.
आणि हे संभ्रम संपत नाहीत अजूनही.
पण तिने असे अवेळी हात पसरायला नको होते.
हृदयभर उमललेले दुःख
मद्यासारखे साकीच्या प्याल्यातून प्यावे
असे डोळे तरी तिने इथे ठेवून जायला नको होते.
कधीही उलगडून पाहिली
तरी तिची सुगंधित आठवण भयानक ताजी असते.
पुढे तिचे पत्र आले.
तर त्यात ती नव्हतीच.

सर्वत्र नुसते तूस उडालेले धुके उभे होते.
नंतर ती शपथपूर्वकही भेटली नाही.
खून करणाऱ्या मारेकऱ्याच्या कटापेक्षाही
हे भयंकर आहे.
आपला एक एक अवयव कापून
कुणी तरी आपल्याच हातात द्यावा तसे.
तिच्या जाण्याने उभ्या राहिलेल्या
प्रश्नांच्या विदीर्ण रानातून भटकता भटकता
सुकुमार धुकेही बंडखोरी करून
भुरभुरत घुसले.
आता परतीची वाट नाही
आणि पुढे रस्ता नाही.
शाप मिळाल्यासारखे हे रान
धुक्यासह गोठून गेले आहे.

—विकास हंडे,
फर्गसन महाविद्यालय,
पुणे ४११०४०

---

# त्यांची कविता

○

वांझ संतापात अश्रू चेहऱ्यावर वाळला
वेदना सोशीत तांडा दुर्बलांचा चालला

पाहती स्वप्नात तेही मुक्त स्वच्छंदी भराऱ्या
दाबुनी इच्छा सकाळी देह त्यांचा हालला

मोजणी त्यांच्या श्रमांची फक्त तोंडी राहिली
ओंजळी राहून कोऱ्या घाम त्यांनी गाळला

गात गाथा गौरवांच्या शारदा शब्दात नाचे
ठखुनी उल्लेख आम्ही मात्र त्यांचा टाळला.

चांदरातीची कथा सांगू नका त्यांना कुणीही
तप्त वैशाखी उन्हाने चंद्र त्यांचा जाळला.

—सुशील अच्युत अत्रे
गरवारे वाणिज्य महाविद्यालय
पुणे ४११००४

**प्रथम पारितोषिक विजेती कथा**

# ....आणि जग वाचले

○

**दातीर ए. एम्.** प्रथम वर्ष शास्त्र

महाविद्यालयाच्या विज्ञान संघटनेतर्फे प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही विज्ञान कथालेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेतील पहिल्या तीन कथा आम्ही येथे देत आहोत.

**—संपादक**

5 4 3 2 1 0 गणकयंत्रावर अंक पडत होते. शून्य येताच अमेरिका सोडून सर्व जगभस्मसात होणार होते. अमेरिकेचा अध्यक्ष रॉबर्ट गणकयंत्रावर पाहत होता. [0] पडताच तुफान वेगाने क्षेपणास्त्रे सुटून सारे जग भस्मसात होणार होते. परंतु गणकयंत्रावर त्याचे चिन्हही दिसत नव्हते. रॉबर्ट आता फारच गोंधळून गेला होता. त्या गुप्त आणि पहारा असणाऱ्या खोलीत त्या दोघांशिवाय इतर कोणीही नव्हते. दोघांनी एकमेकांकडे पाहिले. तत्काळ रॉबर्टच्या मेंदूतून एक सणक निघाली.

अमेरिका सोडून सर्व जगावर त्याने क्षेपणास्त्रे रोखून ठेवली होती. क्षेपणास्त्रे कोणत्या दिवशी सोडावयाची याची तारीख त्याने व त्याच्या विश्वासू सहकाऱ्याने निश्चित केली होती. त्या कामगिरीवर दोन शास्त्रज्ञांनाही नेमले होते. वेळही ठरवली गेली होती. आठ वाजायला फक्त नेमके काही सेकंद कमी होते. गणकयंत्रावर शून्य हा आकडा आला. आणि पडद्यावरील ते दृश्य पाहून दोघेही घायाळ झाले.

दुसऱ्याच क्षणी तो खुर्चीतून उठला आणि ज्या दोन शास्त्रज्ञांचे पथक पाठवले होते त्यांना बोलावून घेतले. शास्त्रज्ञ आले आणि बैठक भरली. त्या सर्वांना घडली ही हकीगत माहीत असल्यामुळे प्रत्येक जण माना खाली घालून बसला होता. एक प्रकारची भीतीची छाया त्यांच्या चेहऱ्यावर पसरली होती. रॉबर्टने एकवार सर्वांकडे पाहिले आणि डोळ्यावरचा चष्मा काढून रुमालाला पुसत त्याने प्रश्न केला. थोड्याच वेळापूर्वी स्मशानभूमीप्रमाणे वाटणारी ती खोली आता राक्षसाप्रमाणे गर्जत होती. रॉबर्टचे डोळे आग ओकत होते. तोंडातून सुटणारा एक एक बाण त्या तिघांना छिन्नविछिन्न करू पाहत होता. आता खोलीत शांतता झाली होती आणि प्रत्येक जण खोलीची छाननी करत होता. गणकयंत्राच्या सहाय्यानेसुद्धा खोलीची तपासणी केली. परंतु त्यांना अपयश आले. त्यांना एकही वस्तू संशयास्पद वाटली नाही.

दुसऱ्या दिवशी रॉबर्टने मायकेलला बोलावून घेतले. रॉबर्टला त्याचा सर्वात जास्त संशय येत होता. त्या दोघांची खूप बाचाबाची झाली. रॉबर्टने तर त्याच्यावर उघडउघड आरोप ठेवला. थोड्याच वेळात ते दोन शास्त्रज्ञही आले. रॉबर्टने सर्वांना आपला अहवाल २४ तासात द्यावयास फर्मावले. शास्त्रज्ञ प्रत्येक गोष्ट आठवू लागले. क्षेपणशास्त्रांचे नकाशे व प्रतिकृतीही तपासण्यात आली. गणकयंत्रेही तपासली गेली. परंतु त्यांना कुठे बिघाड झाला हेच काही कळत नव्हते. मायकेलला तर आता खूपच चिंता वाटू लागली. तो त्याच्या जीवनातील प्रत्येक गोष्ट आठवू लागला. जवळच असलेली एक फाईल त्याने उचलली. सर्व फाईल वाचून काढली. पाननूपान डोळ्याखालून घातले.

परंतु त्या वहीत त्याला काहीही आढळले नाही. त्याच्या जीवनातील प्रत्येक गोष्ट त्यात नमूद केलेली होती. त्याची एक प्रत ऑफिसमध्ये व एक प्रत त्याच्याकडे असे. त्याचप्रमाणे रॉबर्टचीही एक फाईल ऑफिसमध्ये ठेवलेली होती. २४ तास पूर्ण व्हावयास आता फक्त ४ तास बाकी होते. त्यामुळे त्याने रॉबर्टची फाईल तावडतोब वाचावयास घेतली. फाईल वाचत असतानाच "डोळ्यांचे ऑपरेशन" असा मथळा असलेली घटना वाचली. आणि त्याच्या मनाला का कोण जाणे परंतु हायसे वाटले.

याच वेळी इकडे रॉबर्टला हृदयविकाराचा एक सौम्य असा झटका आला. आणि लगेचच त्याच्या वैयक्तिक अंगरक्षकाने त्यांच्या फॅमिली डॉक्टरला बोलावले. डॉक्टर आले. रोगाचे निदान करून डॉक्टर परतणार इतक्यात रॉबर्टने त्यांना जवळ बोलावून ही बातमी अगदी गुप्त ठेवावयास सांगितली. त्यानुसार ती बातमी गुप्त ठेवण्यात आली.

इकडे मायकेलला रॉबर्टला आलेल्या हृदयविकाराच्या झटक्यामुळे बराच वेळ मिळाला होता. ज्या डॉक्टरने रॉबर्टच्या डोळ्यांचे ऑपरेशन केले होते, त्या डॉक्टरचे नाव वहीत नोंदलेले होते. त्यामुळे मायकेलला डॉक्टरांना बोलावून घेणे सोपे गेले. डॉक्टर येण्यापूर्वी मायकेलने खोलीची पूर्णतः तपासणी केली. एका गुप्त ठिकाणी कॅमेरा ठेवून, डॉक्टर ज्या खुर्चीत बसतील त्या खुर्चीवर कॅमेरा रोखून ठेवला. त्यामुळे डॉक्टरची प्रतिमा व ते जे बोलतील ते सर्व टेप केले जाणार होते. थोड्याच वेळात डॉक्टर आले. त्यांनी दरवाजावरची बेल वाजवली आणि मायकेलनेही दरवाजा उघडण्यासाठी बटन दाबले. दरवाजा आपोआप उघडला गेला. डॉक्टर आत आले. मायकेलने डॉक्टरांना खुर्चीत बसावयास सांगितले. डॉक्टर खुर्चीत बसले. 'डॉक्टर मला तुम्हाला काही विचारायचंय. तुम्ही थोडेही खोटे बोलण्याचा प्रयत्न केला तर पुढची सर्व व्यवस्था मी करून ठेवली आहे.' जवळच असलेले बटन मायकेलने दाबले आणि कॅमेऱ्याने आपले काम सुरू केले. 'दोन वर्षापूर्वी तुम्ही रॉबर्टच्या डोळ्याचे ऑपरेशन केले, खरे ना?' डॉक्टरने होकारार्थी मान हलवली. तेव्हा तुम्ही... 'सांगातो'. मायकेलचे वाक्य पूर्ण होण्याआधीच डॉक्टरने ते तोडले.

रॉबर्ट दूरदर्शनवर बातम्या ऐकत होता आणि इतक्यात गुप्त ठेवलेली बातमी ऐकण्यात आली. 'अमेरिकेचे अध्यक्ष मि. रॉबर्ट यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला होता, आता त्यांची प्रकृती उत्तम आहे.' आणि इतकेच काय पण जे डॉक्टर त्यांची प्रकृती तपासण्यास आले होते त्यांचा फोटोही दूरदर्शनवर दाखवण्यात आला. रॉबर्ट आता खूपच बेचैन झाला होता. क्षेपणास्त्रविषयी ठेवलेली गुप्त बातमी उघडकीस आल्यामुळे व त्यामुळे आलेले अपयश यामुळे चिंतेत असलेल्या रॉबर्टने हे ऐकताच तो अर्धमेला पडून राहिला. आता रात्र खूप झाली होती. दोन्ही शास्त्रज्ञांनी आपापला अहवाल सादर केला होता. परंतु मायकेलचा अहवाल अजून आला नव्हता. रॉबर्ट त्याची वाट पाहत, तळमळत पडून राहिला. इतक्यात दरवाजावरची बेल वाजली. रॉबर्टने बटन दाबून एका छोट्याशा मनगटी घड्याळावर पाहिले. त्यात मायकेलची प्रतिमा दिसली. रॉबर्टने दुसरे बटन दाबले. दरवाजा कर्रर्र आवाज करत आपोआप उघडला गेला. मायकेल आत आला. त्याने रॉबर्टला कानात सांगितले, की मला तुमच्याशी काही गुप्त बोलायचंय तेव्हा...हो हो समजलं आणि ताबडतोब रॉबर्टने आपल्या अंगरक्षकाला बाहेर जाण्यास खुणावले.. मायकेलने कॅसेट व्ही. डी. ओ.ला लावली आणि लगेचच पडद्यावर एका व्यक्तीचे चित्र उमटले. बटन बंद करून मायकेलने रॉबर्टला विचारले. या व्यक्तीला आपण ओळखाल का? रॉबर्टने होकारार्थी मान हलवत हो म्हटले. दोन वर्षापूर्वी याच डॉक्टरने माझ्या डोळ्याचे ऑपरेशन केले होते.

अचानक विजेच्या चपळाईने मायकेलच्या हातात पिस्तुल आले. रॉबर्टला क्षणभर काय झाले हे कळेचना. मायकेलने व्ही. डी. ओ. चे बटन चालू करून त्यास पडद्याकडे पाहण्यास खुणावले. पडद्यावर डॉक्टरचे चित्र पुन्हा उमटले आणि आवाज आला...सांगतो. दोन वर्षापूर्वी मी रॉबर्टच्या डोळ्याचे ऑपरेशन केले. त्यावेळी मी पैशाच्या लालचीने रशियाने दिलेले एक अगदी छोटेसे यंत्र उजव्या डोळ्यात बसवले. त्या यंत्रामुळे रॉबर्ट जेथे असेल तेथील ऐकावयास येवू लागले. एवढेच काय पण त्यांना रॉबर्ट जेथे असेल तेथील दिसू लागले. आणि त्या यंत्राचा संपर्क मेंदूशी जोडल्यामुळे रॉबर्टच्या मनात काय विचार चालू आहेत हे सुद्धा समजू लागले. परंतु हे विचार आलेखाच्या

( GRAPH ) स्वरूपात दिसू लागले. त्यामुळे त्याचा संपर्क एका मेलेल्या माणसाच्या मेंदूशी जोडला. त्यामुळे आता ते विचार चित्रांच्या रूपात दिसू लागले. ठिशुंवऽऽऽ डॉक्टर तत्काळ खाली कोसळला. मायकेलने व्ही. डी. ओ. चे बटन बंद केले. अजूनही मायकेलने रॉबर्टवर पिस्तुल रोखलेलेच होते. मायकेलने एक गोळी झाडली आणि रॉबर्ट खाली कोसळला. पिस्तुलचा आवाज ऐकून रॉबर्टचा अंगरक्षक धावतच आला व तावडतोब मायकेलला पकडून खोलीबाहेर जाणार इतक्यात रॉबर्टचा प्राण गेला आणि त्याबरोबरच रॉबर्टच्या उजव्या डोळयातून तप्त असे किरण बाहेर पडले आणि सर्व खोलीभर प्रचंड गडगडाट होवून खूप उष्णता निर्माण झाली. त्या उष्णतेने इमारत पेटू लागली. परंतु जग एका प्रचंड धोक्यातून बचावले.

□

---

द्वितीय पारितोषिक विजेती कथा

# काळे ढग

○

**गिरीश देसाई,** तृतीय वर्ष विज्ञान ( संख्याशास्त्र )

टोकिओच्या विमानतळावर ते महाकाय जंबोजेट उड्डाणाच्या तयारीत होते. विमानाच्या सर्व तपासण्या झाल्या. सर्व जण उड्डाणाची वाट पाहू लागले. वैमानिकाला सुटण्याचा आदेश आला ... आणि अखेर ४०० जीवांना पोटात घेऊन ते महाकाय जंबोजेट निघाले. वातावरण आल्हाददायक होते. हवा अतिशय चांगली असून वारे अनुकूल होते. वैमानिक खुषीत होता. अजून केवळ २ तासांनी हाँगकाँग येणार होते.

" सर्व ठीक आहे ना ? " विमानतळाचा संदेश.

" येस सर, कसलीच अडचण नाही. आम्ही २१०० फुटावर आहोत, " विमानाकडून अगदी व्यवस्थित संदेश येत होते. परंतु आपल्या पुढ्यात दैवाने काय वाढून ठेवले आहे याची मात्र त्या प्रवाशांना काहीच कल्पना नव्हती.

" ... सर, सर मला समोर एक विचित्र ढग दिसतो आहे, मनाला काही तरी गूढ वाटतेय. मला भीती वाटतेय. माझा विमानावरचा ताबा सुटतोय .... " टोकियो विमानतळावर त्या वैमानिकाचे घाबरलेल्या आवाजातील शब्द अखेरचे ठरले. विमानतळावर धावपळ सुरू झाली. हा संदेश शेवटचा ठरला. हाँगकाँगशी संपर्क साधला असता तिकडून नकारात्मक उत्तर आले. शेवटचा प्रयत्न म्हणून इतर देशांशी संपर्क साधला. पण कुणालाही त्या विमानाचा मागमूस आढळला नाही. आता त्या विमानाची आशा सर्वांनी सोडून दिली. त्याचे अवशेष मिळवण्यासाठी हेलिकॉप्टर्स व जहाजे सोडण्यात आली, परंतु अवशेष मिळवण्यात कुणालाही यश आले नाही. मग अवशेष गेले कुठं ?

असे प्रसंग गेल्या दोन वर्षात दहाव्यांदा घडत होते. सर्व परिस्थिती अनुकूल असताना व अपघाताची काहीही शक्यता नसताना विमानाचा व जगाचा संपर्क सुटत असे. व त्या विमानाचे अवशेष गायब होत असत. जणू काही ती हवेतच अदृश्य होत असत. या गूढ प्रश्नाला कोणताही शास्त्रज्ञ समाधानकारक उत्तर देऊ शकत नव्हता. हा गुंता अधिकच वाढत होता. उडत्या तबकड्या, बर्म्युडा-ट्रँगल-प्रमाणे अफवा अधिकच पसरत चालल्या होत्या. सारे जग काळजीत पडले होते.

मेक्सिकन खगोलशास्त्रज्ञ अलेक्सि ग्राहम एके दिवशी दुर्बिणीतून आकाशाचा वेध घेत होता. त्याचवेळी त्याला एक विचित्र दृश्य दिसले. निळ्या आकाशात, प्रखर सूर्य-

प्रकाशात एकच ढग भटकत होता. एक विमान नेहमीप्रमाणे आकाशात उडत होते. तो ढग त्या विमानाच्या आड आला. यात शंकास्पद असे काहीच नव्हते. परंतु पुऱ्या ४ मिनिटांनंतर देखील ते विमान ढगातून बाहेर आले नाही. अलेक्सिला आश्चर्य वाटले. त्याला तो ढग काही निराळाच भासला. काहीशा करड्या रंगाचा तो भेसूर ढग आकाशात एकटाच फिरत होता व आश्चर्याची गोष्ट म्हणजे वाऱ्याच्या अगदी विरुद्ध दिशेने प्रवास करीत होता. ह्या आश्चर्यातून बाहेर पडतो न पडतो तोच त्याला दुसरा आश्चर्याचा धक्का बसला. घारीसारखा एक पक्षी उडता उडता त्या ढगात शिरला परंतु नंतर काही दिसला नाही. आता मात्र अलेक्सिला एक वेगळीच शंका मनात आली. त्याने आपले सहकारी अँड्र्यू आणि पीटर यांना त्या ढगाच्या पाळतीवर ठेवले. नंतर स्वतः काही मोजमाप यंत्रे, दुर्बिणी व इतर उपकरणे घेऊन आला. आपल्या दोघा साथीदारांबरोबर हेलिकॉप्टरमधे बसून तो, त्या ढगाच्या मागावर निघाला. तो विचित्र ढग काही फार लांब गेलेला नव्हता अलेक्सिने त्या ढगापासून " दोन हात " दूर राहून आपल्या प्रयोगास सुरुवात केली.

...काही दिवसातच NASA कडे एक भलामोठा लिफाफा आला. त्यात अनेक हस्तलिखिते होती. तो लिफाफा अलेक्सिनेच पाठवला होता. त्यात त्या ढगाविषयी माहिती दिली दोतीं आणि योगायोगाची गोष्ट अशी एक भारतीय शास्त्रज्ञ जी. एन. श्रीधरन् यांचेदेखील " त्याच ढगा "-वरील संशोधनपर एक पत्र आले. दोघाही शास्त्रज्ञांचे विचार एकमेकांशी तंतोतंत जुळत होते. त्यांच्या मते हा करड्या रंगाचा ढग काही नेहमीचा ढग नव्हता, तर तो एक वेगळाच ढग होता. त्यातील मूलद्रव्यात बाष्प तर अजिबात नव्हते. हवेपेक्षा हलका असा वायुरूप धातू त्या ढगात होता. त्याच्या केंद्रस्थानी अतिशय शक्तिशाली चुंबकशक्ती होती शिवाय त्या ढगातील विचित्र घटक हेही एक गूढच होते. विचित्र यासाठी, की ते घटक पृथ्वीवर अजिबात अस्तित्वात नव्हते त्या ढगाच्या चुंबकक्षेत्रात सापडलेल्या वस्तूचे नंतर विघटन होऊन ती वस्तू पुढे कुठे जात होती हे मात्र अजूनही कळले नव्हते. अर्थात या सर्वांचा सारांश म्हणजे, हा ढग काही साधासुधा ढग नसून पृथ्वीबाहेरून आलेले एक प्रकारचे भयानक अस्त्र होते. अशा प्रकारच्या अस्त्राची कुणीही स्वप्नातदेखील कल्पना करू शकणार नव्हते. मानवजात किती जरी प्रगत झाली असली तरी या प्रकारच्या अस्त्रांची त्याची प्रथमच ओळख होत होती. परंतु आता या अस्त्राचे कौतुक करण्याची वेळ नव्हती, कारण या अस्त्रामुळे पृथ्वीवरील कित्येकांचे नाहक बळी गेले होते. आता हळूहळू हवाईप्रवास म्हणजे देखील एक प्रकारचे संकट वाटू लागले. या अस्त्राला कुठेतरी आळा बसविणे भाग होते. नाहीतर हे अस्त्र पुढेपुढे मानव-जातीच्या ऱ्हासास कारणीभूत ठरणार होते.

निरनिराळ्या देशांनी या ढगाचे सूक्ष्म निरीक्षण करण्यास सुरुवात केली. अनेक प्रयोग अमलात आणले गेले. या बाह्य शत्रूला तोंड देण्यासाठी जणू काही सारी मानवजात एकत्र आली होती.

सततच्या दोन वर्षांच्या अविश्रांत परिश्रमानंतर थोड्या प्रमाणात यश आले. दक्षिण कोरियाच्या शास्त्रज्ञांनी या ढगाचा नाश करण्यासाठी एक प्राथमिक स्वरूपाचा उपाय जगापुढे मांडला. या ढगाचे विघटन करून त्याचे छोटे छोटे भाग नष्ट करणे, ही ती योजना होती. त्यासाठी या ढगावर पृथ्वीवरून अथवा पृथ्वीबाहेरून कृत्रिम उपग्रहाद्वारे सूर्यकिरणांचे एकत्रीकरण करून त्याचा झोत त्या ढगाव विघटन होवू शकणार होते. त्यामुळे काही भागाचीर सोडायचा. त्यामुळे प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होऊन उष्णता त्या ढगाचे वाढून त्या भागातील मूलद्रव्ये बाजूला फेकली जाण्याची शक्यता होती. नंतर लगेचच विमानाने त्या प्रत्येक छोट्या भागावर ॲसिडचा मारा करायचा. परंतु हे सर्व करताना त्यात क्षणाचाही विलंब होऊन चालणार नव्हता. कारण विघटन झाल्यानंतर प्रभावी चुंबकत्वामुळे तो ढग लगेचच पुन्हा एक होणार होता.

सहारा वाळवंटाची ' युद्धभूमी ' म्हणून निवड झाली. २५ कि. मी. त्रिज्येच्या वर्तुळावर आरसे बसवण्यात आले व तेथून बरोबर वर, अंतराळात हजारो फूट उंचीवर भारत, अमेरिका, फ्रान्स व रशियाचे उपग्रह भूस्थिर करण्यात आले. ते उपग्रह जणू आपल्या शत्रूची वाट पहातच उभे होते. ओसाड वाळवंटात मनुष्यवस्ती नसल्या-मुळे प्राणहानीचा प्रश्नच उद्भवत नव्हता. खास बनविलेल्या विमानतळावर अतिशय संहत आम्ले घेऊन, अनेक विमाने आदेशाची वाट बघत उभी होती. तीन उपग्रह ह्या ' ऐतिहासिक युद्धाची कॉमेंट्री ' साऱ्या जगाला सांगण्या-

साठी सज्ज होती. त्याद्वारे सारे जग ते युद्ध टी. व्ही.वर पाहू शकणार होते. सर्व तयारी झाली होती.

तेवढ्यात ज्या क्षणाची सगळेजण वाट पहात होते तो क्षण जवळ आला. निरभ्र आकाशात, त्या भेसूर ढगाने आपले पाऊल टाकले. आपला शेवट जवळ येतो आहे ह्याची त्याला कल्पना नव्हती. साऱ्या जगाला हादरवणाऱ्या अनेक निष्पाप जीवांचे बळी घेणाऱ्या त्या ' व्हिलनने ' शेवटच्या अंकात प्रवेश केला. जगातील नामवंत शास्त्रज्ञ श्वास रोखून समोरील स्क्रीनकडे बघत होते. काऊंटडाउन सुरू झाले. इथे घाई अथवा विलंब चालणार नव्हते आणि थोड्याच वेळात संदेश सुटले. उपग्रहांचे पंखे उघडले गेले. त्यावरील आरशांवर सूर्यप्रकाश पडला व तो पृथ्वीकडे वळला. साऱ्या उपग्रहांच्या प्रकाशाचा तो स्रोत अतिशय दाहक होता. त्याचवेळी पृथ्वीवरील हजारो आरशांची दाहकता वाढतच होती. ह्या सर्वांचा स्रोत ह्या ढगावर पडला व अपेक्षेपेक्षा जास्तच यश मिळून गेले. त्या ढगांचे अनेक पुंजके निर्माण झाले. लगेचच विमाने झेपावली व प्रत्येकातून ॲसिडचा मारा, ढगाच्या प्रत्येक भागावर झाला. एकदम पाऊस पडल्यासारखे वाटले आणि ते भयंकर युद्ध काही वेळातच संपले. सर्वत्र एक विचित्र द्रव पसरला होता. परंतु आता काहीही भीती उरली नव्हती. सारी मानवजात एका भयानक संकटातून बाहेर पडली. मानवाचा विजय झाला. सारी मानवजात विजयाने बेहोष झाली. एवढ्या अखंड परिश्रमाचे अखेर चीज झाले. बाहेरील शत्रूला तोंड देण्यासाठी सारेजण एकत्र येऊ शकतात, हे साऱ्या जगाने दाखवून दिले.

◇

---

तृतीय पारितोषिक विजेती कथा

# नवनिर्मिती

○

**कु. मंजूषा साठे**

---

काऊंट डाऊन सुरू झाला " १०, ९, ८, ७, ६, ५, ४, ३, २, १, ० " आणि प्रचंड कानठळ्या बसणारा आवाज झाला आणि डोळे दिपवणारा प्रकाश सोडत नेपच्यून १० आकाशात उडत परत न येण्यासाठी. चंद्रावर बेस कॅम्प ठोकून २० वर्षे झाली होती. मंगळावर आणि मर्क्युरीवर मानव तीनदा जाऊन आला होता. चंद्रावर हळूहळू वस्ती वाढत होती. रहाण्याजोगी उपकरणे सापडली होती.

नेपच्यून–१० चे असे विशेष होते की ते मानवसहित होते. पृथ्वीला तीन दिवस प्रदक्षिणा घालून नंतर ते बेस कॅम्प वर उतरणार होते. तिथून आणखी इंधन घेऊन मंगळावर आणि मर्क्युरीवर उपकरणे ठेवणार होते. काही वैज्ञानिकांना नुकतेच काही जीवसृष्टी तिथे येऊन गेल्याचे पुरावे सापडले होते पण विशेष म्हणजे ते जितक्या वेळा सापडले होते तितक्याच वेळा नष्ट झाले होते. मर्क्युरीवर विशेष करून तारेचे जाडसर तुकडे सापडले होते. त्यात टंगस्टन-सारखा धातू होता आणि ॲन्टीन्यासारखं पण काही तरी होतं. त्याच्यावर प्रयोग केल्यावर असं लक्षात आलं की कडक उष्णतेपासून रक्षण करणारे किरण त्याच्यात होते. हे तुकडे जपून एका खोलीत ठेवले होते. नंतर बघितले तर ते तुकडे गायब झाले होते ! असे पुष्कळ वेळा झाले.

बेस कॅम्प वर नेपच्यून १० चे स्वागत करायची तयारी झाली. " बीप, बीप, बीप, बीप " कॉम्पुटरजवळचे सगळे सिग्नल्स लावले होते. स्क्रीनवर नेपच्यून १० चे चित्र दिसायला लागले. हळूहळू नेपच्यून १० नियोजित ठिकाणी उतरले. त्याचा मुख्य उद्देश होता की जी नवीन जीवसृष्टी

सापडली होती त्याचा शोध घेणे. असं पण लक्षात आलं की एक नवीन सूर्यमाला तयार झाली आहे. जमल्यास तिचा पण शोध घेणे; पण त्या कामी यश येणार नव्हतं.

अचानक कॉम्प्युटर बंद पडला. फटाफट सगळे दिवे बंद झाले. पृथ्वीवरचा संपर्कच तुटला. चंद्रावरचे सगळे घाबरून गेले त्यांनी कॉन्टॅक्ट करण्याचा खूप प्रयत्न केला पण काही उत्तरच येईना. मग वैज्ञानिकांच्या लक्षात आलं की काही दिवसांपूर्वी थोड्या मोठ्या प्रमाणात भूकंपाचे धक्के बसत होते. एखादे वेळेस प्रलय झाला असण्याची शक्यता होती. कारण अरबी देशात युद्धे चालूच होती. एखादे वेळेस अणुबॉम्ब टाकून सगळंच नष्ट झाल्याची शक्यता होती. शास्त्रज्ञांना हे कसं होईल याची कल्पना होती; पण इतक्या लवकर होईल असं वाटलं नव्हतं. कलीयुग संपलं आणि पृथ्वीच नष्ट झाली.

पृथ्वी इतकी तापली की लाखो वर्षे त्याच्यावर जीवसृष्टी निर्माण होणे शक्य नव्हते. पृथ्वी संपली तरी चंद्रावर वस्ती स्थापन होऊ शकणार होती. आता चंद्रावरच्या लोकांना वाचवायला शास्त्रज्ञांना झटपट काही तरी करायला हवे होते. अन्न चंद्रावर तयार होत होते पण ते फारसे पौष्टिक नव्हते. पृथ्वीवरून आता कधीच मदत येणार नव्हती. शास्त्रज्ञांची दुसरी भीती पण खरी ठरत होती. सूर्याची गुरुत्वाकर्षण शक्ती वाढत होती आणि चंद्र आपली जागा सोडायला लागला. चंद्राच्या फिरकीचा वेग वाढायला लागला आणि प्रचंड आवाज होऊन चंद्राचे तुकडे झाले. सर्व मानवी शक्तीच्या पलीकडले होते. जिथे संपते तिथून नवीन सुरू होते. आणि एकदमच सर्व मानव नवीन सूर्यमाला शोधत होते, त्याच सूर्यमालेत जन्म घ्यायला तयार झाले.

◇

## —। अ । भि । नं । द । न ।—

आमचे खाली नमूद केलेले प्राध्यापक-मित्र अभ्यासमंडळावर निवडून आले आहेत :—

| | |
|---|---|
| प्रा. मुकुंद महाजन — | व्यापारी अर्थशास्त्र |
| प्रा. चिरपुटकर — | संख्याशास्त्र |
| प्रा. म. आ. कुलकर्णी — | इतिहास |
| प्रा. सुधा शाळीग्राम — | मानसशास्त्र |
| प्रा. चं. गु. कुलकर्णी — | गणित |
| प्रा. अ. गो. गोसावी — | व्यापार प्रशासन |

या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन

—संपादक

# आधार

○

**मनोरमा किंभावी,** १२ वी आय वाणिज्य

त्या घरात चार माणसं राहात होती. राहात होती म्हणजे त्यांना राहावं लागतं होतं नाइलाजाने. कारण त्यांच्यापैकी कोणी कुणाला सोडू शकत नव्हतं. या जगात आई आपल्या दोन तरुण मुलींना घेऊन एकटी राहू शकत नव्हती. आणि त्यांचा बाप त्यांच्याशिवाय राहू शकत नव्हता. कारण त्याला दोन वेळा कोण घालणार होतं आयतं शिजवून ? तशी त्याला त्या तिघींची जरूर नव्हती. पण हाकलून देता येणं शक्य नव्हतं म्हणून त्याचा नाइलाज होता. मुली आणि आई मात्र एकोप्याने होत्या. बाप त्यांच्यावर दातओठ खाण्यापलीकडे काही करू शकत नव्हता. आईने सगळी परिस्थिती हेरून माणसं जोडली होती, पण वेळ पडली की त्यांचा काही उपयोग नाही हे ती जाणून होती. पण त्यांच्याच पोकळ आधारावर आपल्या घरात आपण राहू शकत आहोत हेही तिला माहीत होतं. आपले निःसत्व ओठ घट्ट मिटून घेण्यापलीकडे ती काही करू शकत नव्हती. अशा लोकामधे एक व्यक्ती होती. ती म्हणजे तिची म्हातारी सासू. जगात ही एकमेव अशी शक्ती होती, जी तिला आणि तिच्या दोन अशक्त मुलींना आधार मिळवून देऊ शकत होती. त्या अशक्त पण तरुण मुलींना घेऊन ती उघड्या जगात वावरू शकली नसती. आज अठरा वर्षे नवऱ्याच्या घरात काढोस्तोवर ती थकली होती. तिच्या मनाला पोक आलं होतं. सदैव कोळपलेल्या मनाने ती वावरत होती. ती नवऱ्याचा तिरस्कार करत होती. मनस्वी तिस्कारा होता तिला त्याचा. तिची ही वागणूक तिच्या मुलीच्यात पुरेपूर उतरली होती. नवरा तिचा कंटाळा करत होता. असली स्त्री नशिबाशी बांधली गेली म्हणून हळहळत होता. करवादत होता. तिच्यामुळे आपण प्रगती करू शकलो नाही. ही स्त्री म्हणजे आपल्या मागे लागलेला शनी आहे याची त्याला खात्री होती. तो तिच्या मुलींना आपल्या बाजूला फितवण्याचा प्रयत्न करत असे पण तो दरवेळी अयशस्वी होई. घरात तो कोणाशीही बोलत नसे, अगदी आपल्या मुलींशीसुद्धा. त्याची कर्मदरिद्री बायको जवळ नसे तेव्हाच फक्त तो मुलींशी बोले. उदाहरणार्थ जेव्हा त्याच्या बायकोला उपास असे आणि जेवताना तो आणि त्याच्या दोन मुली असत तेव्हा किंवा त्याची बायको भाजी आणायला घराबाहेर पडली असताना. पण मुली त्याला दाद देत नसत. त्यांच्यावर आईचा प्रभाव जास्त होता. कधीही नवे कपडे न देणाऱ्या आणि सदैव करवादल्या मुद्रेने वावरणाऱ्या आपल्या बाबाबद्दल त्यांना विश्वास नव्हता. लहानपणी खाल्लेला त्याच्या हातचा मार त्या अजून विसरल्या नव्हत्या. कोणत्या क्षणी तो आपल्यावर खेकसेल याचा नेम त्यांना नव्हता. लाल गुंजासारखे डोळे करून खेकसणाऱ्या आपल्या बापाबद्दलची त्यांची भावना विलक्षण होती. त्यांच्या या विचित्र भावनेतून त्यांची सुटका करणारी एकमेव व्यक्ती म्हणजे त्यांची आजी. त्यांना माहीत होते या जगात आपला बाप कोणाला घाबरत असेल तर ते त्याच्या म्हाताऱ्या आईला.

अशी बायकोची सासू, नवऱ्याची आई आणि मुलींची आजी असणारी ती करारी म्हातारी स्त्री त्यांच्याकडे मुक्कामाला येणार होती. सगळेच तिची आतुरतेने वाट पहात होते. आईला आणि मुलींना मोकळ्या हवेत श्वास घेता येणार होता. त्यांचं दडपण कमी होणार होतं. त्यांचा बाप त्यांच्यावर खेकसू शकणार नव्हता. तिचा नवरा त्याच्या आईसाठी का होईना हिरवी भाजी घरात आणणार होता. तिला बरेच दिवसांनी रूचकर स्वयंपाक करता येणार होता. तिच्या मुलींच्या मुखात तो घास पडणार होता. पण हे सगळं आपल्या सासूमुळे होणार याचं तिला वैषम्य वाटत होतं. सासूचा दुस्वास वाटत होता. आपण तिच्याजागी असतो तर नवऱ्याने आपल्यावर असेच प्रेम केले असते.

हिरवी भाजी त्याने केवळ आपल्यासाठी आणली असती. पण ह्यातला फोलपणा जाणवून ती अधिकच उदास बनली. जर ती त्याची आई असती तर त्याच्या बायकोचं स्थान तिला कसं मिळालं असतं ? आणि असल्या नवऱ्यापासून तिच्या मुलींचं रक्षण कोणी केलं असतं ? त्या दोन जीवांसाठी ती या नरकात रहात होती. तीच एक चमक तिच्या डोळ्यात होती. त्या दोघी तिचा श्वास होत्या. आता तिची सासू आली की ती तिच्या निमित्ताने नवनवीन पदार्थ बनवू शकणार होती. त्यांच्या वासाने तिची जीभ चाळवली. नाकपुड्या सुखावल्या. जिभेच्या कडेने लाळ उसळून आली. ती अधिकच आतुरतेने आपल्या सासूची वाट पाहू लागली.

तिच्या मुली खुशीत आल्या होत्या. आजी घरात असल्यावर त्या बापासमोरही बेधडक रेडिओ लावू शकणार होत्या. दुपारी झोप येत असताना पेंगत खुर्चीत अवघडून बसण्याऐवजी त्या आरामात झोपू शकणार होत्या. आणि रात्री ट्युबलाईटच्या प्रकाशात जागू शकणार होत्या. त्यांची आजी घरी आली की त्यांचा बाप लवकर घरी येतो हे त्यांना माहीत झालं होतं. आता त्यांना नऊ नऊ वाजेस्तोवर ताटकळत त्याची वाट पहावी लागणार नव्हती. त्या लवकर जेवायला बसू शकत होत्या. जेवताना हसू-बोलू शकत होत्या. अजून थोडी आमटी घेताना; ताक वाटीत ओतून घेताना त्यांना भीती वाटणार नव्हती. तसलं शूरपणाचं कृत्य करताना मान खाली घालून डोळ्यांच्या कोपऱ्यातून आपल्या बापाच्या रोखलेल्या नजरेकडे पहायची त्यांना आता जरुर नव्हती. त्या बेधडकपणे घरात वावरणार होत्या, फक्त आजी यायचीच काय ती कमी होती.

त्याच्या करारी आईपुढे तो चळाचळा कापत असे. तिच्या पवित्रतेपुढे तो कोलमडून पडत असे. ती त्याची सख्खी आई नव्हती. सावत्र पण नव्हती. ती त्याची आई नव्हती. ती त्याची आई नव्हतीच. बाळपणापासून तो तिलाच आई समजत आला होता. पुढेपुढे त्याला कळले की जिला तो आई समजतो ती त्याच्या बापाची रखेली आहे ती. पण तो तिच्याबद्दलचं आपलं प्रेम आटवू शकला नाही. तिनेच त्याला त्याच्या बापाच्या पश्चात मोठा केला होता. तिनेच त्याला शिकवलं होतं त्याचं लग्न करून दिलं होतं. त्याला मार्गी लावलं होतं. त्याच्या मनातला जो काही चांगुलपणाचा, ओलाव्याचा भाग शिल्लक होता तो केवळ आपल्या आईमुळे हे तो जाणून होता. तिने आपल्या पेशाचे इमान सोडून त्याला मोठं केलं होतं. त्याच्या आईपुढे ती सदैव वाकलेला होता.

त्याच्या अशा कर्तबगार आईपुढे त्याची बायको कुणीच नव्हती. आईच्या शब्दाला मान द्यायचा म्हणून केवळ त्याने आपले आयुष्य हिच्यापुढे भिरकावले होते. आपल्या प्रेमाला तिलांजली देऊन.

त्याच्या मनातला खळबळाट थांबेना. केव्हा एकदा आपण आपल्या आईला पहातो असे त्याला झाले. तिला भेटायला तो विलक्षण आतुर झाला. कधी एकदा आपली आई आपल्या दृष्टीस पडते असे त्याला झाले. तिच्या आठवणीने त्याचे मन फुलून आले. तो अधिकच प्रेमाने ओथंबून आपल्या आयुष्यातल्या एकमेव आधाराची वाट पाहू लागला.

♣

---

पटला न एकही शब्द ।
लढण्यात असावी जिद्द ।
रहावे न मुळी स्तब्ध ।
सत्यासाठी ॥

□

## ‘ पुण्यवान ’

आमच्या भारतवर्षातल्या बायका
फारच पुण्यवान हो
पूर्वी पतीच्या चितेबरोबर जळायच्या
आता पतीच्या हातून जाळल्या जातात
‘ अहेव मरण ’ म्हणजे पुण्यच

— उमेश म. झिरपे
तृतीय वर्ष, वाणिज्य

□

# पोवळे

○

**कु. नीता गजानन जोशी**, एफ. वाय. बी.एस्सी.

**भ**गवान शंकराला रुद्राक्ष, विष्णूला तुळस तर गणपतीला पोवळे प्रिय. पोवळ्याला विद्रुम असेही म्हणतात. हे एक रत्न मानतात.

पोवळे म्हणजेच प्रवाळ. हे प्रवाळ म्हणजेच असंख्य लहान लहान जीव एकत्र आलेले असतात. परिश्रमाने काय काय करता येते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजेच हे प्रवाळ किंवा पोवळे. यांनाच कोरलस असेही म्हणतात. ह्या प्रवाळांचे मोठमोठे खडक समुद्रात दिसून येतात. या खडकांवर बारीक बारीक नळीसारखी भोके दिसतात. त्या प्रत्येक भोकात एक एक लहान लहान प्राणी असतो. ह्या प्राण्यांची घरे म्हणजेच हे प्रवाळ. पोवळे म्हणजे प्रत्यक्षात साधी चुनखडी असते.

सागरी सृष्टीतील सर्वात संपन्न जीव प्रवाळ खडकात पहावयाला मिळतो. प्रवाळांचे इतके असंख्य रंग आहेत की प्रत्येक प्रवाळ जणू अप्रतिम रंगाचे लेणे घेऊनच जन्माला आलेला आहे असे वाटते. हे समुद्रातले लहान जीव स्वतः-भोवती संरक्षणासाठी चुनखडी तयार करतात. असे लक्षावधी जीव आणि त्यांच्या नळ्या एकत्र येतात आणि प्रचंड प्रवाळ-खडक तयार होतात. ऑस्ट्रेलियाच्या पूर्वोत्तर असलेल्या समुद्राला तर 'कोरल–सी' (प्रवाळ समुद्र) असेच नाव पडले आहे, कारण या ठिकाणचे प्रवाळखडक १२०० मैल लांब आणि ९० मैल रुंद असे पसरले आहेत. दक्षिण समुद्रातील काही भाग ह्या खडकांमुळे निरुपयोगी झालेला आहे. लखदीव आणि मालदीव बेटे म्हणजेच प्रवाळांचे खडकच आहेत. कोरल्स सी ॲनेमोन स्पंज हे लहान लहान प्राणी एकमेकांना चिकटून राहतात. त्यांचे पुनरुत्पादन अलैंगिक पद्धतीने व जास्त प्रमाणात होते. त्यामुळे असंख्य जीव एकदम जन्माला येतात आणि नंतर मोठे खडक निर्माण होतात. हे प्राणी जेव्हा बाल्यावस्थेत असतात तेव्हा ते मुक्तपणे समुद्रात संचार करीत असतात. तर काही मात्र बाल्यावस्थेत एकाच जागी चिकटून राहतात. आणि मोठेपणी मात्र स्वैर होतात. आणि वाळूच्या तळाशी किंवा चिखलात अणकुचीदार टोकावर स्वतःला पुरून घेतात. दिवसा कोरल्समधील प्राणी शांतपणे आणि आकुंचन अवस्थेत पडून असतात. परंतु रात्री मात्र ते प्रसरण पावतात, मोठे होतात. आणि समुद्रातील लहान लहान प्राणी खातात व स्वतःची गुजराण करतात. कोरल्स-मधील काही प्राण्यांना लहान दोऱ्यासारखे अवयव असतात. आत बुळबुळीत पदार्थ असतो. ह्या दोऱ्यासारख्या अवयवामार्फत ते आपले भक्ष्य तोंडात टाकतात. मोठे कोरल्स लहान लहान मासेसुद्धा खातात.

अशा ह्या कोरल्समधे असंख्य आकार आणि प्रकार आहेत. त्यांचे रंगही अप्रतिम असतात. पांढऱ्या रंगाचे प्रवाळ हे अतिशय सुरेख दिसते. या शिवाय तांबडा, पिवळा, हिरवा, गुलाबी, जांभळा, सोनेरी, तपकिरी रंगांचे पोवळे असते. तांबड्या आणि नारिंगी रंगाचे पोवळे सोडले तर इतर पोवळ्यांचा रंग उन्हामुळे रंगहीन होतो. त्यामुळे पांढऱ्या रंगाचे पोवळे खूप मिळतात. तांबडे व नारिंगी रंगाचे पोवळे खोल पाण्यात मिळत असल्याने त्यांचा रंग तसाच राहतो. हेच तांबडे पोवळे अंगठीत किंवा इतर दागिने करण्याकरता वापरतात. काही पोवळे रंगहीन होत असताना निस्तेज होतात. परंतु बाजारात त्यांना चांगली मागणी मिळण्यासाठी ते कृत्रिमरित्या रंगहीन करतात. काही कोरल्सच्या वसाहतीचा वरचा भाग तांबडा, हिरवा दिसतो. कारण प्रवाळाच्या लहान लहान छिद्रातून रंगीत शेवाळे आत जाते व ते तेथेच राहाते. त्याचा रंग प्रवाळाला येतो.

खऱ्या कोरलसचे २५०० प्रकार आहेत. काही प्रकार कपासारखे असतात. हे प्राणी चुनखडीच्या कपामधेच बसल्यासारखे दिसतात. काही प्राणी लांब लांब राहू शकतात तर काही इतक्या जवळ जवळ असतात की तो एक मोठा कप असल्यासारखेच वाटते किंवा एक मोठी रांग तयार होते. कधी कधी गोलाकार आकार धारण करतात तेव्हा त्यात खोबण्या तयार होतात. काही कोरलसमध्ये ह्या खोबणीच्या कडा नागमोडी असतात. काही कोरलस तबकडी-सारखे तर काही कावळ्याच्या छत्रीसारखे असतात. ह्या कोरलसमध्ये छत्रीसारख्या म्हणजे तबकडीसारख्या भागात प्राणी राहतात. ते मोठे झाले म्हणजे तबकडी त्या देठापासून मोकळी होते व नवीन तबकडी परत तयार होते. काही कोरल्स तर बागेतल्या फुलांसारखे मोहक व सुंदर असतात. काहींचा रंग सोनेरी आणि त्यांची पाकळ्यासारखी किंवा फांद्यासारखी रचना असते. ह्यांच्या खोबणीत खेकड्यांची मादी अंडी घालते आणि लहान लहान पिल्ले तिथेच जन्म घेतात. कधी कधी कोरल्सचा आकार वाढत गेला, म्हणजेच चुनखडीचे आवरण जास्त जास्त तयार होत गेले म्हणजेच ही पिल्ले त्यात बंदिवान होतात. कोरलसना लहान लहान छिद्रे असल्याने त्यांना हवेचा पुरवठा सतत होत असतो.

ब्रिटनमध्ये खोल समुद्रात तांबडे व सोनेरी चांदणीसारखे कोरल्स सापडतात. भक्ष्य मिळवण्यासाठी तयार झालेले अवयव तर गडद पिवळे असतात. ह्या कोरल्सला त्याच्या अप्रतिम सौंदर्याने बाजारात फार मोठे स्थान आहे. अटलांटिक महासागरात पंख्याच्या आकाराचे कोरल्स खोल रुतलेले आढळतात. ते इतके नाजूक दिसतात की हात लावल्यास तुटेल का काय असे वाटते; परंतु चुनखडीचे असल्याने थोडे कणखर असते. सर्व समुद्रात फांद्या फांद्यासारखे कोरलस मोठ्या प्रमाणावर आढळतात. मेडिटरेनीयन समुद्राचे प्राणी नारिंगी असल्याचा भास होतो, परंतु पाण्याखाली हे कोरलस शांतपणे पडलेले दिसतात. काही ॲटॉल्स नावाचे कोरलस म्हणजे एक अतिशय सुंदर स्वप्नच वाटते. ते घोड्याच्या नालाच्या आकाराचे किंवा गोल असून त्याच्या आजूबाजूला मॅनग्रूव्हज् किंवा इतर सागरी वनस्पती चिकटतात आणि ते एक छोटेसे बेट असल्याचा भास होतो. काही कोरलस काळे असतात तर काही बोटांसारखे दिसतात. म्हणून त्यांना इंग्लंडमध्ये 'मेलेल्या माणसाच्या हाताची बोटे' असेच नाव प्रचलित झाले आहे. काही ट्यूबसारखे असतात.

सर्वसाधारण कोरल्सचे मुख्य तीन गट पाडलेले आहेत. (१) फ्रिजींग रिफ्स! : यामध्ये कोरल्स जमिनीला चिकटूनच वाढतात जमीन आणि यांच्यामध्ये एक बोगदाच तयार होतो (२) ॲटॉल : ह्या प्राण्यांच्या वसाहती इतक्या प्रचंड असतात की त्यांची बेटेच तयार होतात. ह्या बेटांचे आकार गोल किंवा घोड्याच्या नालासारखे-सुद्धा असतात. त्याच्या मध्यभागी एखादे सरोवरही असू शकते. त्याला ॲटॉल म्हणतात. (३) बॅरिअर रिफ्स : काही प्रवाळ-खडकांच्या रांगाच्या रांगा समुद्राखाली तयार होतात. ह्या रांगा २००० किलोमीटर लांबीपर्यंतसुद्धा असू शकतात. कधी कधी रांगांमधून एक लांबलचक बोगदा तयार होतो, त्यातून बोटीही संचार करू शकतात. अशा प्रकारचे कोरल्स ग्रेट बॅरिअर रीफ म्हणून ओळखले जातात.

अशा ह्या अप्रतिम कोरल्सचा उपयोग दागदागिन्यां-साठी दिवाणखान्यात 'शो-पीस' म्हणून म्युझिअम्समध्ये बांधकामात होतो, रोमन शहरात तर शोभिवंत बांधकामात कोरल्सचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. कारण हे कोरल्स एक इंचापासून कित्येक फुटापर्यंत उंच असतात चीन देशात काळ्या पोवळ्यांची ब्रेसलेट करण्याची फॅशनच आहे. याशिवाय ह्या कोरल्समधून इंधन मिळविण्यासाठी अनेक बडी बडी राष्ट्रे संशोधन करीत आहेत. प्रवाळापासून प्रवाळ-भस्म तयार करतात. त्याचा वैद्यकशास्त्रात प्रामुख्याने उपयोग होतो. या प्रवाळ-भस्मामुळे रक्त शुद्ध होते, हाडे बळकट होतात, अंगात शक्ती येते, अशक्तपणा कमी होतो. वैद्यकशास्त्रात लाल रंगाच्या पोवळ्याला जास्त मागणी आहे. म्हणून 'नेकलेस' हे विशेषतः लाल रंगाचे असते. लहान मुलांना जेव्हा दात येतात तेव्हा होणारा त्रास कमी करण्यासाठी प्रवाळाचा उपयोग करतात.

सूक्ष्म जीवांचे चुनखडीचे घर म्हणजेच पोवळे; परंतु हे घर सुद्धा असंख्य लहान सूक्ष्म जीवांनी मेहेनत करूनच बांधलेले असते.

♣

# गाजर गवताचे गडांतर कसे टाळाल?

○

कु. संध्या देशमुख, एफ. वाय. बीएस्सी. 'बी'

गाजर गवताला 'चटक चांदणी,' 'काँग्रेस गवत,' 'फंदफुली' (Phandaphuli) अशी कितीतरी नावे रूढ आहेत. शास्त्रीय परिभाषेत त्याला पार्थेनियम हिस्टेरोफोरस (Parthenium Hysterophorus L. family-compositae) असे नाव आहे. वेस्ट इंडिज बेटात हे विपुल प्रमाणात सापडते. भारतात मात्र साधारणपणे १९५३ साली अमेरिकेतून आणलेल्या अन्नधान्यातून आले असे म्हणतात. आणि आता तर 'गाजर गवत' ही एक कायमची 'डोकेदुखीच' होऊन बसली आहे. विशेषतः शेतकरी लोकांना ह्याचा फार त्रास होतो. कारण गहू, मका, तांदूळ, ऊस ह्यासारख्या शेतात ते जोमाने वाढते.

ही 'चटक चांदणी' नुसती शेतातच वाढून त्रासदायक झाली नाही; तर ती मनुष्यालासुद्धा अनेक कारणांनी तापदायक ठरली आहे. काही लोकांना या गाजर गवताच्या स्पर्शाने ॲलर्जी निर्माण होऊन संपूर्ण शरीर लाल फुटकुळ्यांनी भरून जाते, तर काहींना दम्यासारखा कायमचा भयानक विकार जडतो, तर कित्येकांना कातडीचे रोग होतात. अशा या महाभयंकर गाजर गवताचा नाश करणे आता अगदी कठीण होऊन गेले आहे. तरी सुद्धा प्रयत्न केले तर भारतातून हे 'गाजर गवत' नक्कीच नष्ट होईल. नुसते हातांनी उपटून देऊन भागणार नाही, तर त्यासाठी आपल्याला गाजर गवताची संपूर्ण शास्त्रीय माहिती करून घेऊन त्यावर काही उपाय आहे का, हे शोधणे आवश्यक आहे.

## दलदल साठू देऊ नका

हे गाजर गवत झुडपाएवढे असते. परंतु कधी कधी ते १ ते २ मीटर उंचीपर्यंतही वाढू शकते. याचे खोड पांढरे असून त्यावर बारीक बारीक केस असतात. खोडावर खोबण्या असून अनेक लहानमोठी 'पेरे' (Nodes) असतात. पानांच्या कडा कातरल्यासारख्या दिसतात. त्याचे मूळ जरी खूप खोल नसले तरी पसरत बरेच वाढते; ह्या 'चटक चांदणी'ला साधारणपणे जून महिन्याच्या शेवटी किंवा जुलैच्या सुरुवातीला फुले येतात. सप्टेंबरच्या प्रारंभाला बिया तयार होऊन वाळल्या की, तेथेच पडून रुजतात किंवा झाडाचा वरचा भाग मरून पडतो. परंतु सर्वात जमिनीलगतच्या पेराजवळच्या फांद्या बरेच दिवस जगतात. जेथे दलदल जास्त असते, तेथे गाजर गवताला बाराही महिने फुले व बिया येतात. म्हणून शक्यतो शेतात दलदल साठू देऊ नये. ह्या 'चटक चांदणी' वर विशिष्ट प्रकारची बुरशी येते.

## तृणनाशके वापरा

फुले येण्याच्या आधीच म्हणजे एप्रिल, मे मध्ये गाजर गवत उपटून जाळून टाकावे म्हणजे बी तयार होऊ शकणार नाही. जेथे उपटून टाकणे अगदीच अशक्य असेल तेथे बाजारात उपलब्ध असलेली 'तृणनाशके' (Herbicides) वापरावीत. पुणे येथील नॅशनल केमिकल लॅबोरेटोरीने, (NCL, Pune) एक प्रभावी व अल्प किंमतीत मिळणारे Herbicides शोधून काढले आहे. त्यामुळे ही 'चटक चांदणी' नाहीशी होऊ शकेल असे वाटते. हे 'तृणनाशक अगदी कमी प्रमाणात, ठराविक वेगाने, आणि ठराविक दिवस वापरले तर गाजर गवताबरोबर इतरही 'तण' (Weeds) नाहीसे होतील अशी आशा आहे. आणि 'जमिनीचा कस'ही फारसा बदलणार नाही. ह्या तृणनाशकामध्ये २-४ डायक्लोरोफेनॉक्सी ॲसीटील क्लोराइड (2-4 dichlorophenoxy acety chloride) हे प्रमुख रसायन असून त्याशिवाय त्यात लाकडाचा भुसा

( Saw dust ) व इतर पदार्थ-रसायने ( Chemicals ) यांचा समावेश आहे

तृणनाशक तयार करण्यासाठी लागणारी साधने बहुतेक सर्व आपल्याच देशात तयार होत असल्याने ते कमी किंमतीत मिळू शकते.

### संशोधकांचे परिश्रम

गाजर गवतावर सध्या बरेच संशोधन सुरू आहे. ' चटक चांदणी ' ही आता नुसती ' डोकेदुखी ' राहिली नसून त्यातून काही नवीन नवीन औषधे शोधून काढण्यात शास्त्रज्ञ गुंतलेले आहेत. ताप कमी होण्यासाठी, अतिसारावर, मासिक पाळीच्या तक्रारीवर इत्यादी अनेक कारणांसाठी ही ' चटक चांदणी ' आपल्याला उपयुक्त ठरेल, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे. गाजर गवतामध्ये Anti-Cancer चे काही गुणधर्म आहेत असे प्रतिपादन नॅशनल केमिकल लॅबोरेटोरीमधील शास्त्रज्ञांनी केले असून मुंबईच्या Cancer Research Centre मध्ये यावर मोठ्या प्रमाणात संशोधन चालू आहे. ह्या गाजर गवतापासून निकृष्ट प्रतीचा का होईना परंतु कागद तयार होतो. दिल्लीच्या काही शास्त्रज्ञांनी ह्या ' काँग्रेस गवतापासून ' तेले ( Essential Oils ) काढण्यात यश मिळविले आहे. परंतु त्याचे प्रमाण बरेच कमी म्हणजे ०.०२ टक्के इतके असते.

असे हे गाजर गवत अत्यंत तापदायक असले तरी काही प्रमाणात आपल्याला उपयोगी पडून दिलासा देणारे आहे.

♣

---

## बहारीचे दिवस

कधी कधी एकांतात ढगाळलेल्या मौसमात
आठवतात ते बहारीचे दिवस
सकाळच्या कोवळ्या उन्हात
गवताच्या गालिच्यांवरील दवबिंदूंना तुडवीत
तुझ्या सोबत केलेली ती मस्त सफर
माथ्यावरील सूर्याच्या रणरणत्या उन्हात
आम्रवृक्षांच्या गर्द सावलीमध्ये
नीरव शांततेत तुझ्याशी केलेल्या गुजगोष्टी
अस्ताला जाणाऱ्या सूर्याच्या साक्षीने
नदीकिनारीची वाळू तुडवीत जाताना
घेतलेल्या त्या शपथा दिलेली ती वचने
अशा वेळच्या आठवणी
स्वैर कोसळणाऱ्या पावसाच्या पाण्यात
विरघळून तर जात नाहीतच तर
त्यामुळे त्यांना नवा बहरच येतो

– मिलिन्द वाईकर
बारावी आय ( वाणिज्य )

□

## मंत्रिओंका मंत्र

ऋषिओंने बनाये खूब मंत्र बरसों पहले ।
कई सच हुए और होंगे, सत्य है ।
हमने न सोचा है, जो ऋषिओं ने लिखा था ।
वर्तमान का भविष्य भूत में ऐलान किया था ।
हम एहसानमंद है उनके, किया हवाले मंत्रोंको ।
गायत्री मंत्र वरदान है, हमारे मंत्रिओंको ।
ध्यान करते हैं गायत्री मंत्र का ।
बडा ही अनर्थ करते हैं अर्थ का ।
" शरणम् राज-रानी । सब आपके हाथ ।
कुर्सी देवा भव । यही है प्रार्थना । "
पुरखों को तब ना ही हाथ लगता शासन ।
प्रार्थना करते, दे बस एक ही आसन ।
अफसोस, तब रानी कहाँ जो दे दे कुर्सी ।
भू-रानीनें दान दी थी हिमालय की कुर्सी ।
ऋषि और मंत्रिओं में फर्क नहीं इतना ।
आसक की कुर्सी बनी, कुर्सी का आसन कब होगा ?

संदीप दिनकर तवले

□

# आजची युवा चळवळ दिशाहीन आहे काय ?

○

**कु. राजश्री खैरे**, ११ वी कला

सकाळी पेपर उघडला नि सर्वात प्रथम एका बातमीवर माझी नजर खिळून राहिली एका २३ वर्षाच्या तरुणानं आपल्या आयुष्याला कंटाळून आत्महत्या केली होती. ' प्रयत्न करूनही मला कोठेही नोकरी मिळत नाही नि घरातली परिस्थिती मी पाहू शकत नाही म्हणून मी आत्महत्या करत आहे. ' असं त्यानं लिहून ठेवलं होतं.

१९८५ साल ' युवा-वर्ष ' म्हणून साजरं करण्यात येत आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच एका, तुमच्या–आमच्या-सारख्याच, तरुणाने आपलं जीवन संपवलं होतं. तसं पाहिलं तर आजच्या युवकवर्गापुढे अनेक समस्या आहेत. बेकारी ही तर भारतात वाढतच आहे. एखाद्या शिकलेल्या तरुणाला जेव्हा नोकरीसाठी इंटरव्ह्यूला बोलावलं जातं तेव्हा...अनेक समस्या मी आता सोडवू शकेन ही अशा त्याला वाटते. पण इंटरव्ह्यू हा फक्त देखावाच असतो. कोणत्याही मोठ्या साहेबांचं शिफारश-पत्र त्याच्याजवळ नसतं,त्यामुळे त्याला ती नोकरी मिळणार नसते हे निश्चित. त्याच्या इंटरव्ह्यूच्या आगोदरच दुसरा कोणी तरी त्या जागेवर नेमलेला असतो. भले मग त्याची पात्रता असो अगर नसो. नोकरीच्या इंटरव्ह्यूसाठी येणारा तरुण जर गरीब असेल तर त्याच्याबद्दल प्रश्नच नसतो, कारण तो गरीब असल्यामुळे त्याला कोणत्याही साहेबांचं सहकार्य मिळणं शक्य नसतं, हे तर सत्यच आहे ! अशावेळी मिळवलेली प्रशस्तीपत्रकं त्याची भूक भागवणार नाहीत किंवा त्याच्या घरच्यांनाही उपयोगी पडणार नाहीत. मग ? अशावेळी हा तरुण काय करेल ? एकतर तो वाईट मार्गाला तरी लागेल, नाहीतर आपले आयुष्य संपवून टाकेल. त्याला जबाबदार कोण ? तुम्ही ? आम्ही ? की आपला मानवता विसरलेला समाज ? ज्याच्याकडे पैसा आहे तो राजा नि ज्याच्याकडे तो नाही तो भिकारी अशीच वागणूक आजचा समाज युवकांना देत असतो. त्यामुळे युवकांच्या मनात समाजाबद्दलची घृणा वाढत जाईल. विस्तवाची एक ठिणगी आग लावण्यास पुष्कळ ठरते. युवक आज समाजाशी नफरत करतील. ती नफरत व्यक्त करण्यासाठी अनेक वाईट मार्ग अवलंबतील. मग समाज, शहर, राज्य नि संपूर्ण देशच ह्या आगीत भस्मसात होईल. मग लोक हा विचार करणार नाहीत की असे का घडले ? तुम्हीच तरुणांच्या मनात स्वतःबद्दलच नफरत निर्माण करत आहात. अशा तरुणाला आपल्या समाजाबद्दल नि मुख्य म्हणजे आपल्या देशाबद्दल कधीच आदर वाटणार नाही, प्रेम वाटणार नाही. मग ? असा देश पुढे येणार तरी कसा ? देशातील युवक एकत्र येऊन अनेक समस्या सोडवू शकतील पण त्यांना नेताही तसाच हवा !

हे झालं आजच्या युवकांपुरतंच ! युवकांपुढे जशा अनेक समस्या आहेत तशाच आजच्या युवतींपुढेही अनेक समस्या आहेत. स्त्री मुक्ती आंदोलने होतात ती कशासाठी ? स्त्रीयांवरचे अत्याचार वाढत आहेत. लग्न झालेली स्त्री जेव्हा हुंडाबळी ठरते त्याला जबाबदार कोण ? आजचा युवक ? की त्याचे घृणात्मक विचार ? हे त्याला समाजच शिकवत असतो ना ? आजची युवती ही कोणत्याही गोष्टीत मागे पडत नाही. ती आपला संसारही सांभाळते नि नोकरी करून आपल्या घराला उच्च स्थानावर पोहचवण्याचा प्रयत्नही करते. परंतु आपला समाज पुरातन काळापासून स्त्रीला फक्त स्त्री म्हणून ओळखतो. त्याचसाठी ही स्त्री-आंदोलने होतात. आपल्या एका बरोबरीच्या युवतीवर अत्याचार झालेले पाहून कोणती युवती गप्प बसेल ? ती कधी ना कधी याचा सूड उगवेलच. नि मग सगळा समाज, सगळा देश तिला दुश्मन वाटू लागेल. तिला समान हक्क प्राप्त झाले, तिला आपल्या सुरक्षिततेबद्दल अशा

वाटू लागली तर ती देशाला वाचवण्यासाठी आपली कुर्बानीही देईल. पण तिला समानतेने वागवले पाहिजे. तिच्याकडे एक स्त्री म्हणून न पाहता आपल्या देशाची नागरिक म्हणून पाहिले पाहिजे. ह्यासाठी आपला समाज सुधारला पाहिजे. समाज सुधारला की देश सुधारण्यास कितीसा वेळ लागेल ?

हे काम करू शकतात आजचे युवक नि युवती ! कारण आजचा युवकवर्गच देशांतर्गत शांतता राखू शकतो. आपल्या देशातच जर अशा प्रकारे अशांतता असेल तर बाहेरच्या राष्ट्रांना आपल्या देशाची वाताहत करायला कितीसा वेळ लागेल ? ते तर हेच इच्छितात. अमाप कष्टांनी स्वतंत्र झालेला आजच्या युवा–नागरिकांमुळे पुन्हा पारतंत्र्यात जायला नको आहे. " आम्ही एक आहोत " ही फक्त घोषणाच राहायला नको आहे. ते प्रत्ययास यायला पाहिजे. त्यासाठी झटावं लागेल तुम्हाला ! आम्हाला ! नि आपल्या भारतदेशाला !

♣

---

## अथांगतेची संक्षिप्तता

अचानक ते शिंपले उघडले गेले आणि,
पाण्याच्या एका थेंबात सामावलेला
अथांग सागर मी बघितला
भावभावनांच्या अनेक लाटा
उसळल्या होत्या त्यात
पण माझ्या विषयीचा एक तरी
तरंग होता का त्यात ?
सागराच्या सीमा ओलांडून किनाऱ्याकडे
धावणाऱ्या लाटा मी बघितल्या पण
फक्त किनाऱ्याला स्पर्शून पुन्हा त्याच
सागरात विलीन होणाऱ्या लाटा मला जाणवल्या
आणि अचानक भरती आली
लाटांना बांध घालणे किनाऱ्याला अशक्य झाले
आणि ते शिंपले मिटले गेले
अथांग सागर एका थेंबाच्या रूपानं खाली ओघळला
केवळ मनानं त्या सागरात जलक्रीडा करणारा मी
ओहोटी आल्यावर दूर राहिलो किनाऱ्यावर
एकटा अगदी एकटा
वाट बघत पुन्हा पुन्हा येणाऱ्या त्या भरतीची
सागराचे ते संक्षिप्त रूप पाहून
सागराच्या अथांगतेचा अर्थ मला समजला
आणि मग मला कळून चुकले की तो,
एक अश्रु होता अश्रु

– माधुरी दाते
एफ. वाय. बी. कॉम.

□

## सोबती

मीच नाही
मुळीच या जगात एकटी
झाडाचे पान अन् पानं
एकटेच आहे
माणसाच्या जीवनात,
शेवटी सावलीच ' सोबती ' आहे

□

## अगतिक

वखवखलेल्या पोटावर हात ठेवून
अगतिक
ती उभी होती
दोन जीवांची ' आई '
पोटाची भूक शमविण्यासाठी
अगतिक
वखवखलेल्या नजरेची आज
ती लक्ष्य होती
पोटाचा प्रश्न सुटला आजचा
पण
ती अडकली होती
